जा. क्र. [illegible]/२०२१-२२/५०                    दि. १३/४/२०२२

**प्रति,**

**मा. श्री. राजेंद्रजी (दादा) शिवाजीराव नागवडे**
**अध्यक्ष, श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, श्रीगोंदा फॅक्टरी.**
**अध्यक्ष, महाविद्यालय विकास समिती, श्री छ.शि.म. श्रीगोंदा.**

**विषयः-** माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागविलेल्या माहितीबाबत...
**संदर्भः - श्री भाऊसाहेब भुजंगराव पवार रा. वांगदरी, ता. श्रीगोंदा यांचा दि. ०८.०४.२०२२ चा अपिल अर्ज.**

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये श्री भाऊसाहेब भुजंगराव पवार यांनी त्यांचा माहिती अधिकार अर्ज दि. १६.०३.२०२२ अन्वये आपले कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यरत असलेल्या अनुदानित व विना अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याबद्दलची माहितीची यादी मागविलेली होती. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी त्यांची वैयक्तिक माहिती त्यांच्या परस्पर कोणालाही देण्यात येऊ नये अशा प्रकारचे अर्ज महाविद्यालयाकडे सादर केलेले असल्यामुळे सदरची माहिती देता येणार नाही असे संबंधितांना लेखी पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे. परंतु श्री भाऊसाहेब भुजंगराव पवार यांनी सदरबाबतची माहिती मिळणेकरिता मा. प्रथम अपिलीय अधिकारी, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा यांचेकडे उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलाची सुनावणी घेण्यात येऊन सदरबाबतचा निर्णय संबंधित श्री पवार यांना कळविण्यात येईल.

आपल्या माहितीसाठी सविनय सादर.

**कळावे,**

**सोबतः -** श्री पवार यांच्या अपिल अर्जाची छायांकित प्रत

आपला विश्वासू,

**अपिलीय अधिकारी**
श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर




## जोडपत्र ब

(नियम ५ (१) पहा)

**माहितीचा आधिकार अधिनियम, २००५ याच्या कलम १९(१) खालील अपील.**

प्रेषक भाऊसाहेब भुजंगराव पवार मु.पो. बांगर्डे ता. श्रीगोंदा जि. अ.नगर पिन 413726 (8805001518)
(अपीलकाराचे नाव व पत्ता)

प्रति मा. प्रथम अपील अधिकारी, श्री छ. शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा
(अपील प्राधिकाऱ्याचे नाव/पदनाम/पत्ता)

(१) अपीलकाराचे संपूर्ण नांव : भाऊसाहेब भुजंगराव पवार

(२) पत्ता : मु.पो. बांगर्डे ता. श्रीगोंदा जि. अ.नगर Pin 413726

(३) राज्य जन माहिती आधिकाऱ्याचा तपशील : जनमाहिती अधिकारी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय

(४) ज्या आदेशाविरुध्द अपील केले आहे तो आदेश मिळाल्याचा दिनांक. (आदेश काढला असल्यास) : —

(५) अपील दाखल करण्याचा अंतिम दिनांक : 15/05/2022

(६) अपीलाची कारणे : माहिती अधिकाराखाली माहिती दिली नाही

(७) माहितीचा तपशील - :
(एक) हव्या असलेल्या माहितीचे स्वरुप आणि विषय : अनुदानित विनाअनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची माहिती
(दोन) माहिती ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित आहे त्याचे नांव : श्री छ. शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा

ठिकाण : श्रीगोंदा

दिनांक : 8/4/2022

BBPawar
अपीलकाराची सही.